वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक–अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार–मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

## जोहरन ममदानीने जसा न्युयॉर्कमध्ये महापौर होवून इतिहास घडविला तसाच इतिहास बीडमधून शेख मुजीब हे नगराध्यक्ष होवून घडविणार

# बीडचा जोहरन ममदानी म्हणजे शेख मुजीब



तडफदार
तरूण
खंबीर
विकासाभिमुख
सर्वसामान्य
नेतृत्व
दुरदृष्टी

Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

## न्युयॉर्कमध्ये झालेल्या महापौर निवडणूकीत जोहरन ममदानींना सर्व समाजाच्या मतदारांनी मतदान करून महापौर केले त्याप्रमाणे सर्व समाजाचे मतदार शेख मुजीब यांच्या पत्नीला मतदान करून नगराध्यक्षा करतील

बीड, (दिव्य न्युज):– काल पासून नगर पालिका निवडणुकी करीता उमेदवारी अर्ज भरण्यास सुरूवात झाली आहे. सर्व अर्ज हे ऑनलाईन भरायचे आहेत. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांना द्यायची आहे. सोमवारी एकही उमेदवारांनी नगराध्यक्षा सह नगरसेवक पदासाठी अर्ज भरलेला नाही. आज मिळालेल्या माहितीनुसार नगरसेवक पदासाठी १३ ते १४ उमेदवारी अर्ज आले आहेत. बीड नगर पालिकेच्या निवडणुकी करीता सर्वात जास्त चर्चाआहे ती म्हणजे नगराध्यक्ष पदासाठी. बीडचे नगराध्यक्ष पद हे अनुसुचित जातीसाठी राखीव असून या करीता सर्वच पक्षाकडून उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. आतापर्यंत कोणत्याच पक्षानी आपल्या नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहिर केलेला नाही. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बीड येथील सायं.दै. सिटीझनचे संपादक शेख मुजीब यांच्या पत्नी ने उमेदवारी मागितलेली आहे. त्या सोबत इतरांनीही या पक्षाकडून उमेदवारी मागितली असून येणाऱ्या दोन दिवसात सर्वच पक्षाकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांची घोषणा होणार आहे.

बीडमध्ये सर्वात जास्त चर्चा आहे ती म्हणजे शेख मुजीब यांची.... एका सामान्य कुटूंबात जन्मलेले शेख मुजीब हे आज एका वृत्तपत्राचे संपादक आहेत. सर्व समाजाशी त्यांचे मैत्रीपूर्ण आणि चांगले संबंध असून मागील दोन दिवसापासून प्रसार माध्यमात शेख मुजीब यांच्या पत्नीला उमेदवारी द्यावी यासाठी सर्वच समाजाच्या लोकांनी जाहिर पत्रके काढून उमेदवारीचे समर्थन केलेले आहे. अमेरिकेतील न्युयॉर्क शहरात दोन तीन दिवसापुर्वी महापौर पदाची निवडणुक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या निवडणुकीची जगभरात चर्चा होत आहे. ती जोहरन ममदानी यांची... भारतीय मुळचे असलेले जोहराम ममदानीहे गुजरात राज्याचे रहिवाशी आहेत. ते व्यवसायानिमित्त युगंडा या देशात गेले. तेथून त्यांचे वडील आणि संपूर्ण कुटूंब हे व्यवसायानिमित्त अमेरिकेत स्थाईक झाले. या न्युयॉर्क शहरावर अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्या पक्षाचे वर्चस्व आहे. या पुर्वीचे महापौर हे याच पक्षाचे होते पण जोहरन ममदानी यांनी अत्यंत नियोजनबध्द निवडणूक लढविली, प्रचार यंत्रणा राबविली. सर्वच समाजातील मतदारांनी त्यांनी गाठी भेटी घेतल्या आणि न्युयॉर्क शहराला अजुन कसे सुंदर शहर करता येईल याचे नियोजनबध्द लेखाजोखा त्यांनी मतदारांसमोर मांडला. मतदारांना ते पसंत पडला. तिथल्या मतदारांनी अमेरिकेतील कोणत्याही मोठ्या आणि आर्थिक स्थितीत मजबुत असलेल्या पक्षाच्या आमिषाला बळी न पडता एका साधारण कुटूंबातील व्यक्तीला चक्क न्युयॉर्क शहराचे महापौर करून टाकले. तशीच काहीशी स्थिती बीडमध्ये शेख मुजीब यांच्या विषयी निर्माण झाली आहे. मुस्लिम असो, दलित असो, मराठा असो की ओबीसी समाजातील मतदार असो. सर्वाचे जोरदार समर्थन ▶▶ पान २ वर

## जिल्ह्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ

# सतीष शेळके यांनी धनुष्यबाण उचलला तर कुंडलिका खांडे यांनी हातात घेतली मशाल

बीड , (दिव्य न्युज):– स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असल्याने राजकीय हालचाली ही गतिमान झाल्याचे दिसून येत आहे. अनेकांचे प्रवेश सोहळे साजरे होत असताना आता बीडमध्ये ही दोन चेहरे प्रवेश करणार असून यात कुंडलिक खांडे यांनी पुन्हा ठाकरे सेनेत प्रवेश करुन पुन्हा एकदा मशाल पेटवली आहे. याचा त्यांनी सोशल मीडियावरून संकते दिले होते. तर सतीश शेळके धनुष्य बाण उचलणार असल्याचे त्यांनी ही फेसबुक पोस्ट करुन संकेत दिले आहेत. यात शेळके जिल्हापरिषद निवडणुकीसाठी इच्छुक असून, कुंडलिक खांडे ठाकरे सेनेत प्रवेश केला असल्याने त्यांना कोणती जबाबदारी मिळणार याकडे लक्ष लागले आहे. मागे एक डिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर शिंदे सेनेने कुंडलिक खांडे यांच्यावर कारवाई केली होती. तेंव्हा पासून कुंडलिक खांडे हे कोणत्याही पक्षात नव्हते यामुळे ते ▶▶ पान २ वर



# प्रभाग क्रं.१८ मधून सय्यद नदीम यांना घड्याळाची उमेदवारी

## प्रभागात मोठा जनसंपर्क, मित्र परिवार अन् मतदारांच्या आशिर्वादामुळे विजय निश्चित



बीड, (दिव्य न्युज):– बीड शहरातील प्रभाग क्रं. १८ मधून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मागील दोन दिवसापुर्वी नगर पालिका निवडणुकीच्या नगरसेवक पदाच्या इच्छुक उमेदवारांची मुलाखती घेण्यात आल्या. पक्षाचे नेते माजी आ.संजय दौंड, बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, नगर पालिकेचे गटनेते फारूक ▶▶ पान २ वर

# नेकनूरकरांनो, पंचायत समिती निवडणूकीत शोएब आमदार यांना साथ द्यावी

## न्युयॉर्कमध्ये जोहरन ममदानी यांनी जसा इतिहास घडविला तसाच इतिहास शोएब आमदार हे घडवतील



नेकनुर, (दिव्य न्युज):– सध्या राज्यभरात निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. आता नगर पालिका निवडणुक होत असून येणाऱ्या काही दिवसात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीची तारीख जाहिर करण्यात येणार आहे. नेकनूर हा मोठी बाजार पेठ असून संपूर्ण जिल्हाभरात या नेकनूर गावाची चर्चा होत असते. या नेकनूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणात आजपर्यंत अनेक जण निवडणूक गेले पण म्हणावे तसा विकास या नेकनूरचा झालेला नाही. ▶▶ पान २ वर

# 'ट्रॅप फेल'चा आरोप; अधिकाऱ्यांवरच अविश्वास निर्माण झाल्यास बीड 'एसीबी'वर कसा राहणार विश्वास?




बीड , (दिव्य न्युज):– येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील एका पोलीस निरीक्षकाने संगनमत करून 'ट्रॅप' फेल केल्याचा गंभीर आरोप करत थेट छत्रपती संभाजीनगर येथील एसीबीच्या पोलीस अधीक्षकांकडे तक्रार करण्यात आल्याने पोलीस दलात मोठी खळबळ उडाली होती. जर लाचखोरीच्या कारवाया करणाऱ्या अधिकाऱ्यांवरच असे गंभीर आरोप होत असतील, तर एसीबीवर सामान्यांचा विश्वास कसा बसेल आणि तक्रारदार पुढे कसे येतील, असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

गेवराई तालुक्यातील एका शेतकऱ्याने गायगोठ्याच्या वर्कऑर्डरसाठी पंचायत समितीतील अधिकाऱ्याकडे लाच मागितल्याची तक्रार घेऊन १ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड एसीबीचे पोलीस उपअधीक्षक आणि नंतर पोलीस निरीक्षक कवडे यांना भेट घेतली. निरीक्षकांनी दुसऱ्या दिवशी ५ ते ५:३० वाजेदरम्यान बोलावले आणि 'पंच नाहीत, दोन दिवसांनी या' असे सांगून वेळ मारून नेली. वास्तविक पाहता, उपअधीक्षकांना भेटल्याचे सांगितल्यावरही निरीक्षकांनी उशिरा आल्याचे कारण दिले. विशेष म्हणजे, ट्रॅप फेल झाल्यानंतर त्याच दिवशी (२ ऑक्टोबर ▶▶ पान २ वर



# बीड नगरपरिषदेसाठी १३ उमेदवारी अर्ज!

## नगरपालिका प्रशासनाकडून मदत कक्षासाठी एक टेबलची सोय

बीड, (दिव्य न्युज):– नगरपरिषद निवडणुकीच्या पोर्शभूमीवर आज मंगळवारी (दि.११) १३ उमेदवारांचे ऑनलाईन उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत. पण ऑफलाईन एकही अर्ज आज दुपारी १:३० वाजेपर्यंत प्राप्त नव्हता. तसेच ऑनलाईन उमेदवारी अर्जची साईड धिम्या गतीने चालत असल्याची चर्चा सुरू आहे. नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज दुसरा दिवस आहे. काल पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही. परंतु आज मंगळवारी दुसऱ्या दिवशी दुपारी १:३० पर्यंत ऑनलाईन पद्धतीने १३ उमेदवारी अर्ज बीड नगरपरिषदेसाठी आले आहेत. पण ऑफलाईन अर्ज एकही दुपारपर्यंत दाखल झालेला नव्हता. तर अर्ज स्वीकारण्याच्या कक्षात आज एक टेबल नगरपरिषद कार्यालयात सुरू आहे. उद्यापासून अर्ज भरण्यासाठी पान २ वर

### बीड शहरात सोमवारी पहाटे साडेचार वाजता कार चालकाला भोवळ आल्याने घडली धक्कादायक घटना

# प्रसूतीनंतर कार नाल्यात; नर्सने वाचवले आई अन् बाळ

बीड, (दिव्य न्युज):- रात्री ११ वाजता प्रसूतीच्या वेदना होत असलेल्या महिलेला पहाटे ४ वाजता रुग्णालयात कारने नेत असतानाच बीड शहरातील अंबिका चौकात प्रसूती झाली. त्यादरम्यान प्रचंड रक्तस्राव झाल्याने आणि बाळ जोरात रडल्याने चालकाला भोवळ आली. त्यामुळे गाडी नाल्यात उलटली. याची माहिती एका नर्सला मिळताच ती घटनास्थळी दाखल झाली.

नर्सने नाल्यात उतरून नाळ कापली आणि बाळ व आईला गाडीबाहेर काढून दवाखान्यात नेले.बीड शहरातील अंबिका चौक परिसरातील एका महिलेला रविवारी रात्री ११ वाजता प्रसूतीच्या वेदना होत होत्या. पहाटे चार वाजता पती, महिला आणि चालक एका कारमधून महिलेच्या उपचारासाठी रुग्णालयात जात होते. अंबिका चौकात कार आल्यानंतर महिलेची प्रसूती कारमध्येच झाली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात नाल्याचे काम सुरू होते. तेथे मोठ्या सळया टाकलेल्या होत्या. चालकाला चक्कर आल्याने कार थेट नाल्यात जाऊन उलटली. याची



माहिती प्रसूती झालेल्या महिलेच्या पतीने मित्र विकास गव्हाणे यांना दिली. त्यांनी आपला मित्र संकेत कुलकर्णी यांना सोबत घेऊन सोमवारी पहाटे ४.३० ते ५ च्या दरम्यान घटनास्थळ गाठले. तेथे नाल्यात उतरून बाळाला आणि आईला बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आई आणि बाळाचा नाळ एकत्र असल्याने त्यांना ते शक्य झाले नाही. त्यांनी तत्काळ बीड येथील नर्स अंजली पोपळे यांना कॉल करून मदतीसाठी बोलावले. नर्स अंजली पोपळे यांनी स्त्रीरोग सहायक ज्ञानेश्वर लाखे यांना मदतीला घेऊन घटनास्थळ गाठले. त्यांनी नाल्यात उतरून नाळ कापली आणि बाळ व आईला सुखरूप बाहेर काढले. बाळाला बाल रुग्णालयात तर आईला रुग्णालयात दाखल करण्यात आले. नर्स आणि स्त्रीरोग सहाय्यक आल्यानंतर त्यांनी बाळाला गाडीबाहेर काढले. त्यावेळी विकास गव्हाणे आणि संकेत कुलकर्णी यांनी तत्काळ बाळाला शहरातील श्री बाल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. येथे डॉ. सचिन जेथलिया यांनी उपचार केले. बाळ ठणठणीत असल्याचे त्यांनी सांगितले. अपघातानंतर आई आणि बाळाला वेगवेगळ्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासून दोघांचीही प्रकृती ठणठणीत असल्याचे सांगितल्यानंतर आई उपचार घेत असलेल्या कृपाळू हॉस्पिटलमध्ये बाळालाही दाखल करण्यात आले. बाळ पाहून आईने त्याला अलगद मिठी मारली. त्यांना चार वर्षाचा मुलगा असून आताही मुलगा झाला आहे.

### न.प.कर्मचारी धांडेंची आत्महत्या

# गंभीर आरोप असतांनाही अद्याप गुन्हा दाखल नाही

## नोटपॅडमध्ये नावे असलेले कारवाईच्या भीतीने गायब

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषदेत वसुली विभागात कार्यरत असलेले कर्मचारी अविनाश धांडे यांनी ७ नौव्हेंबर रोजी नगरपालिकेच्या छतावरील शिडीला गळफास घेऊन आत्महत्या केल्याने खळबळ उडाली होती. मात्र, घटनेला तीन दिवस उलटूनही आणि मृताच्या मोबाइलमध्ये चौघांवर गंभीर आरोप असलेला धक्कादायक मजकूर सापडलेला असतानाही, सोमवारी दुपारपर्यंत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला नाही. यामुळे या प्रकरणावर संशय व्यक्त केला जात नावे असलेले सर्वच लोक गायब आहेत. सोमवारी निवडणूकीत अर्ज दाखल करण्याचा पहिला दिवस असतानाही हे प्रमुख अधिकारी, कर्मचारी गैरहजर असल्याचे सांगण्यात आले. गुन्हा दाखल झाल्यावर पोलीस अटक करतील, या भितीने सर्वच फरार झाल्याचे सांगण्यात आले. अविनाश धांडे हे शुक्रवारी दिवसभर नगरपालिकेसमोर बसलेले होते. सायंकाळी चहा पिल्यानंतर ते गायब झाले. रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने नातेवाईकांनी शोध घेतला असता, नगरपालिकेच्या छतावर त्यांनी गळफास घेतल्याचे दिसले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह






शवविच्छेदनासाठी हलवला. अंत्यसंस्कार झाल्यानंतर त्यांच्या मोबाइलमधील 'नोटपॅड' मध्ये सापडलेल्या मजकुरामुळे हे प्रकरण गंभीर बनले आहे. यात काही लोकांनी अन्याय केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता, मात्र अजूनही या प्रकरणात पोलीस दफ्तरी कसलीही नोंद झालेली नाही. दरम्यान या प्रकरणात नातेवाईक आलेले नाहीत. त्यांच्या तक्रारीनुसार पुढील कारवाई केली जाईल. ते जर लवकर आले नाहीत तर आकस्मात मृत्यूची नोंद करून तपास केला जाईल अशी माहिती शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी दिली.

### निता अंधारे, वाघमारे, कदम, तिडके, काळेंवर गंभीर आरोप

धांडे यांच्या नोटपॅडमधील गंभीर आरोप डीपीओ संभाजी वाघमारे यांनी अनुभव नसणाऱ्यांना प्रमोशन दिले आणि लायक असलेल्यांना डावलले, तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी गोपनीय अहवालामध्ये (सीआर) कमी गुण दिले, सम्राट कदम व विश्वांभर तिडके (वसुली विभाग) यांनी केवळ 'दाम करी काम' (पैशांच्या जोरावर काम) केले. तर चंद्रकांत काळे यांनी अविनाश धांडे यांचा पुरेपूर फायदा घेतला.

पान ४ वरून

## काँग्रेसचे शेख

राबवतात. याचा जनतेसह पक्षालाही लाभ होतो. पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी यांच्या वाढदिवसानिमित्ताने गोरगरिबांना मोफत जेवण देतात. राष्ट्रीय काँग्रेस चे नेते राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेत सुद्धा ते सहभागी होते. जिल्हा रुग्णालयात रक्ताचा तुटवडा होऊन रुग्णांना त्रास होऊ नये, याकरिता ईद-ए-मिलादुन्नबी निमित्ताने दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करतात. दिवस असो की रात्र जनतेच्या आवाजाला धावून येतात. जिल्हा रुग्णालय, तहसील कार्यालय, नगर परिषद, पोलीस ठाणे किंवा अन्य कोणतेही शासकीय-प्रशासकीय कार्यालय असो जनतेच्या कामासाठी, अडीअडचणी सोडविण्यासाठी ते सदैव तयार असतात. प्रभागातील रस्ते, नाल्या आणि विजेच्या प्रश्नासाठी ते सातत्याने नगरपरिषद आणि महावितरण कंपनीकडे संपर्क साधून स्वच्छता मोहीम राबवितात. पथदिवे लावून घेतात. यावेळी मतदारांनी संधी दिल्यास नगरसेवक म्हणून बीड नगर परिषदेकरवी प्रभाग क्रमांक ११ मध्ये प्रभागातील नागरिकांसाठी असलेल्या ओपन स्पेस मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आणणे, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरू करणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी पेन्शनर पार्क बनविणे, याशिवाय प्रभागाला पाली आणि माजलगाव धरणाचे पाणी कमीत कमी चार दिवसाआड मिळण्यासाठी प्रयत्न करणे, या कामांवर त्यांचे विशेष लक्ष राहणार आहे. सर्वसामान्यांसाठी अहोरात्र झटणाऱ्या या जनसेवकाला प्रभागातील मतदार यावेळी निवडणुकीत नगरसेवक केल्याशिवाय राहणार नाही, असे एकंदरीत चित्र आहे. बीड नगर परिषदेत नगरसेवक म्हणून अशा व्यक्तिमत्त्वाची नितांत गरज आहे.

## विद्यार्थ्यांच्या

केले की, 'विनोबा भावे प' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांचा सराव घेता येईल. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ मिळेल. तसेच पचा प्रभावी वापर करणाऱ्या शिक्षकांचा 'मासिक गौरव पुरस्कार' देऊन सत्कार केला जाईल, असे त्यांनी जाहीर केले. कार्यशाळेत पची सविस्तर माहिती व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक श्री. विजय वावगे व हितेश भालेराव यांनी दिले. त्यांनी शिक्षकांना पच्या विविध फिचर्स, परीक्षा सराव मॉड्यूल्स, व उपक्रम नोंदणी प्रक्रियेबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी श्री. समंदरखान यांनी केले. त्यांनी सांगितले की, बीड तालुक्यातील शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून शिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यासाठी पुढाकार घ्यावा. विनोबा भावे प'मुळे शिक्षणात डिजिटल क्रांती घडेल . आभार प्रदर्शन केंद्रप्रमुख हकीम मणियार यांनी केले. कार्यक्रमात शिक्षण विस्तार अधिकारी श्री. माटे, सर्व केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती, केंद्रीय विषय शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संस्कार प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. शोभाताई यांनी सभागृह व सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्याबद्दल गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले. संपूर्ण कार्यशाळेने शिक्षकांना डिजिटल शिक्षणाच्या नव्या वाटा दाखवून दिल्या असून 'विनोबा भावे प' शिक्षण व्यवस्थेला एक नवीन आधुनिक दिशा देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## संजय राऊतांसाठी

राऊत कट्टर विरोधक, सडकून करतात टीका, तरीही

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर शिवसेना पक्षाची दोन शकलं पडली. अनेक मंत्री, आमदार शिंदे यांच्यासोबत गेले. संजय राऊत आणि सुनील राऊत हे मात्र माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहिले. या बंडानंतर संजय राऊत यांनी अनेक वेळा एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीक केलेली आहे. जाहीर सभेत, भाषणात, पत्रकार परिषदेत संजय राऊतांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करण्याची एकही संधी सोडलेली नाही. दुसरीकडे एकनाथ शिंदे तसेच त्यांच्या पक्षातील अनेक नेत्यांनीही राऊत यांच्यावर अनेकवेळा बोचरी आणि खोचक टीका केलेली आहे. म्हणूनच शिंदे आणि संजय राऊत हे तसे मोठे राजकीय मतभेद असलेले नेते आहेत. परंतु संजय राऊतांची प्रकृती बरी नसल्याने हे सर्व मतभेद विसरून एकनाथ शिंदे यांनी सुनिल राऊत यांच्याकडे संजय राऊतांच्या प्रकृतीची चौकशी केली आहे. महाराष्ट्राच्या प्रगल्भ राजकणाचेच हे एक उदाहरण असल्याची भावना यामुळे व्यक्त होत आहे.

एकनाथ शिंदे फोन करून नेमकं काय म्हणाले?

एकनाथ शिंदे यांनी सुनील राऊत यांच्याकडे संजय राऊतांच्या प्रकृतीची चौकशी केली आहे. संजय राऊत हॉस्पिटलमधून घरी आले का?असे एकनाथ शिंदे विचारताना दिसत आहेत. तसेच त्यांना सांगा की लवकर बरे व्हा, असा निरोपही एकनाथ शिंदे यांनी सुनील राऊत यांच्याकडे दिला आहे. काही दिवसांआधी संजय राऊतांची प्रकृती बिघडल्याचे समोर आले होते. त्यानंतर पुढच्या वर्षी मी तुमच्या भेटीला येईल, असे राऊतांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सांगितले होते. उपचार चालू असतानाच त्यांची प्रकृती खालावली होती. त्यानंतर त्यांना भांडूपच्या फोर्टीस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर १० नोव्हेंबर रोजी त्यांना डिस्चार्ज मिळाला होता.

पान १ वरून

## बीडचा जोहरन

शेख मुजीब यांच्या पत्नीला आहे. फक्त पक्षाकडून उमेदवारी मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे त्यांचा प्रचार आणि गाठीभेटी थांबलेल्या आहेत. आज मतदारांचीच मागणी आहे की, बीडचे आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलिम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी शेख मुजीब यांच्या पत्नीला उमेदवार म्हणुन उमेदवारी द्यावी. ज्याच्यामुळे सर्वच प्रभागात नगरसेवक पदाच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनाही याचा फायदा होईल आणि बीड नगर पालिकेवर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता येईल आणि आ.संदीप क्षीरसागर यांना शहरात काम करण्यास एक सच्चा, तरूण, तडफदार कार्यकर्ता मिळेल. मतदारांची जोरदार मागणी आहे की, आ.संदीप क्षीरसागर यांनी उशीर न करता शेख मुजीब यांच्या पत्नीला उमेदवारी द्यावी. शेख मुजीब यांना पक्षाने उमेदवारी नकारली तर त्यांनी दुसऱ्या पक्षाकडून उमेदवारी घेतली तर याचा सर्वात जास्त फटका आ.संदीप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवक पदाच्या उमेदवारांना बसेल. मागील निवडणुकीत आ.संदीप क्षीरसागर यांच्या काकू नाना विकास आघाडीचे १९ नगरसेवक निवडून आले होते तर नगराध्यक्षपदाचे उमेदवार हे काही मतांनी पराभुत झाले होते. त्याचा वचपा काढण्याची ही संधी संदीप क्षीरसागर यांना शेख मुजीब यांच्या रूपाने आलेली असून आ.संदीप क्षीरसागर यांनी आता उशीर न करता शेख मुजीब यांना उमेदवारी देवून बीडचे नगराध्यक्ष करून जसे न्युयॉर्कमध्ये जोहराम मंमदानी यांनी इतिहास घडविला तसाच इतिहास शेख मुजीब हे नगराध्यक्ष होवून घडवितील असेच काहीसे चित्र सध्या बीड शहरात दिसून येत आहे.

## प्रभाग क्रं.१८ मधून

पटेल, बळीराम गवते, अमर नाईकवाडे, भागवत तावरे यांनी मुलाखत घेतली होती. या प्रभागातून महिला ओबीसी करीता सय्यद नदीम यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे. त्यानी अभ्यासापूर्ण आणि प्रभागातील सर्व माहिती निरिक्षकांकडे दिली. सय्यद नदीम यांचा दांडगा जनसंपर्क या प्रभागात असून मोठ्या प्रमाणात नातेवाईक आणि कुटूंब आहे. मित्र परिवारांची मोठ्या संख्येने साथ आहे तसेच या प्रभागातील सर्वच समाजातील मतदारांचा आशिर्वाद सय्यद नदीम यांना असल्याने पक्षाने त्यांना अधिकृतरित्या उमेदवारी दिली. घड्याळ या चिन्हावर हे ओबीसी महिलामधून महिला उमेदवार उभे करणार आहेत. सय्यद नदीम हे बीडचे जेष्ठ नेते मोईन मास्टर यांचे पुतणे असल्याने याचा जास्तीत जास्त फायदा त्यांना या प्रभागात होणार आहे. मोईन मास्टर यांचा आशिर्वाद आणि ताकद त्यांच्या सोबत असल्याने त्यांना निवडणूक सोपी जाणार आहे. तसेच राष्ट्रवादीचे नेते संपादक शेख तय्यब यांच्यासह राष्ट्रवादीचे गटनेते फारूक पटेल यांचीही ताकद त्यांना मिळणार आहे. पक्षानी योग्य उमेदवाराला या प्रभागातून उमेदवारी दिल्याने प्रभागातील मतदारांनी समाधान व्यक्त करत सय्यद नदीम यांना भरघोस मते देण्याचे आश्वासन दिले आहे.

## नेकनूरकरांनो, पंचायत

प्रत्येकानी आप आपले घर भरण्याकडेच जास्त लक्ष दिले. ज्याच्यामुळे नेकनूरचा विकास होवू शकला नाही. नेकनूरचा खडा ना खडा माहिती असणारे नेकनूरचे समाजसेवक शोएब आमदार हे आता पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी सज्ज झाले आहेत. नेकनूरकरांना शोएब आमदार यांना साथ देवून पंचायत समिती सदस्य करून पंचायत समितीच्या सभागृहात पाठवावे. जसा इतिहास न्युयॉर्क शहरामध्ये जोहराम ममदानी यांनी घडविला तसाच इतिहास नेकनुर पंचायत समितीच्या निवडणूकीमध्ये घडविणार आहेत. इतर कोणत्याही उमेदवारांच्या भुलथापांना बळी न पडता नेकनूरकरांनी शोएब आमदार यांना पंचायत समिती सदस्य करून नेकनूरच्या विकासासाठी त्यांना पंचायत समितीच्या सभागृहात पाठवावे. ज्याच्यामुळें नेकनूर गावात विकास कामांसाठी निधी येईल, विकास कामे होतील त्याच्यामुळे नेकनुरचा विकासाचा नूर शोएब आमदार यांच्यामुळे दिसून येईल. आतापासूनच मतदारांनी शोएब आमदार यांना साथ देण्याचे ठरवून त्यांना या निवडणूकीत विजयी करून इतिहास घडविण्याची संधी द्यावी.

## सतीष शेळके यांनी

काय निर्णय घेणार याची उत्सुकता होती. अखेर ती उत्सुकता संपली असून काही वेळा पूर्वी त्यांनी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली ठाकरे सेनेत प्रवेश केला. याचे संकेत त्यांनी फेसबुकवर 'आई जगदंबे, तूच आमची मातोश्री लढण्याचं बाळकडू जिथे, तिथेच आमची इतश्री जय महाराष्ट्र' तर व्हाटस्प आज चे स्टेटस 'कर्तव्याची मशाल तेवते अखंड!' दिले होते. या प्रवेशाचा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पक्षाला त्यांच्या संघटन कौशल्याचा फायदा होणार आहे. जिल्हापरिषद, पंचायत समिती निवडणुकीत बीड मतदारसंघात पक्षाला फायदा होणार आहे. पण त्यांनी प्रवेश केल्याने आता कोणती जबाबदारी मिळणार याकडे आता लक्ष लागले आहे. तर आ. संदीप क्षीरसागर यांचे निकटवर्तीय स्वीसहायक म्हणून काम पाहणारे सतीश शेळके यांनी ही आ. क्षीरसागर यांची साथ सोडली असून, त्यांनी मागेच नवगन राजुरी जिल्हापरिषद गटातून निवडणूक लढवणार असल्याचे घोषित केलेले आहे. पण ते कोणत्या पक्षातून निवडणूक लढविणार याची उत्सुकता होती. आता ही उत्सुकता ही संपली असून, त्यांनी काल फेसबुकवर हातात बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो असलेली व जय महाराष्ट्र अशी पोस्ट केली. यामुळे ते शिंदे सेनेत प्रवेश करुन धनुष्य बाण उचलणार असल्याचे संकेत दिले. आज ते जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. यामुळे सतीश शेळके यांचा बीडमध्ये लोकांशी असलेल्या संपर्काचा फायदा शिंदे सेनेला होणार असे दिसून येत आहे. यामुळे या दोन्ही प्रवेशांची बीड शहर व तालुक्यात जोरदार चर्चा सुरू आहे. खांडे आणि शेळके यांच्या प्रवेशाचा खरंच फायदा होणार का? हे मात्र निकालाच्या नंतरच दिसून येणार आहे.

## बीड नगरपरिषदेसाठी

गर्दी वाढण्याची शक्यता असून, मोठी संख्या वाढली तर १३ टेबल करण्यात येणार आहेत अशी माहिती सीओ फडसे यांनी दिली. तसेच प्रत्यक उमेदवारी अर्ज प्रथम ऑनलाईन करणे बंधनकारक असून यानंतर तो ऑफलाईन दाखल करायचा आहे. परंतु आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निवडणुक आयोगाची वेबसाईट धिम्या गतीने चालत असल्याची चर्चा आहे. यामुळे याकडेही निवडणूक आयोगाने लक्ष द्यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

## 'ट्रॅप फेल'चा आरोप

२०२५) गेवराईच्या गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित शेतकऱ्याला व्हॉट्सपवर 'तुमची फाईल ओके झाली' असा मेसेज केला. लाचेची मागणी असताना फाईलला अचानक गती आल्याने, पोलीस निरीक्षकांवर आरोप करत तक्रार केली.

एसीबीचे बीड युनिट अडचणीत

हा नवा प्रकार समोर आल्याने बीड एसीबीचे युनिट अडचणीत आले आहे. यापूर्वीही बीडच्या एसीबीवर 'हप्ते' घेत असल्याचा आरोप झाला होता, तसेच एका अधिकाऱ्यावर गुन्हाही दाखल झाला होता. याशिवाय, एसीबीच्या कारवायांमध्येही मोठी घट झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार, २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये आतापर्यंत कारवायांची संख्या तीन ने कमी आहे. अशा परिस्थितीत, 'ट्रॅप फेल' झाल्याच्या आरोपांमुळे सामान्य नागरिकांचा एसीबीवरील विश्वास डगमगण्याची भीती व्यक्त होत आहे. या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

उपअधीक्षकांची झाली होती बदली

यापूर्वी हप्तेखोरीच्या आरोपांमुळे उपअधीक्षकांची बदली झाली होती. तसेच एका अधिकाऱ्यावर पैसे मागितल्याच्या आरोपावरून २०२१ मध्ये गुन्हाही दाखल झाला होता. एक आरोपी याच कार्यालयातून पळूनही गेला होता. त्यात आणखी एका प्रकरणाची भर पडली आहे. बीडचे युनिट वादात सापडल्याने चौकशीची मागणी होत आहे.